२१) जर नकाशात दर्शविलेल्या गणणपत्रकात / आकडेमोड (कॅलक्युलेशन्स) मध्ये विकास नियंत्रण नियमावतीली तरतुदीशी विसंगत अशी चुक / दोष आढळ्यास, ईमारतीचा / बांधकामाचा तो भाग जो बसत नाही तो अनधिकृत ग्राहय धरल्या जाईल. याबाबत जिल्हाधिकारी, नागपूर जो निर्णय घेतील तो निर्णय अंतिम राहील.

२२) समास अंतरामध्ये असलेले विद्यमान बांधकाम पाडण्यात यावे. हा परवाना कोणतेही अस्तित्वातील बांधकाम जे जिल्हाधिकारी यांनी मंजूर केलेले नाही असे बांधकाम मंजूर करणार नाही.

२३) बांधकामाच्या साहित्याची अशा तऱ्हेने व्यवस्था करावी जेणे करुन त्यामुळे ड्रेन, पावसाचे पाणी व वाहतुक इत्यादींना अडथळा निर्माण होणार नाही. त्यामुळे अडथळा निर्माण झाल्यास जिल्हाधिकारी यांचे तर्फे कायदेशिर कार्यवाही करण्यात येईल.

२४) बांधकाम परवानगी करीता सादर केलेल्या मालकी हक्क व इतर कागदपत्रांमध्ये काही दोष असल्यास अथवा सदरची कागदपत्रे खोटी व दिशाभुल करणारी असल्यास सदरची परवानगी रद्द समजण्यात येईल.

२५) स्ट्रक्चरल स्टॅबिलीटी (**Structurail Stabilit**) संबंधी सक्षम स्थापत्य अभियंत्याचे प्रमाणपत्र एक महिन्याचे कालावधीत **सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर** यांचेकडे सादर करावे.

२६) नकाशे व आराखडे तयार करुन आराखडयानुसार सक्षम अभियंत्याचे देखरेखीखाली बांधकाम पूर्ण करुन घेण्याची व. त्याप्रमाणे बांधकाम हे **भारतीय मानक संस्थेने (N.B.S.S)** विहीत केलेल्या तरतुदीनुसार पूर्ण करुन घेण्याबाबत सक्षम स्थापत्य अभियंत्याचा वास्तुशास्त्रज्ञाचा दाखल प्राप्त करुन घ्यावा.

२७) उक्त वापराचे अनुषंगाने सौर ऊर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा अर्जदार यांना स्वखर्चाने करणे बंधनकारक राहील.

२८) नियोजीत बांधकामामुळे भुखंडावर असलेल्या कोणत्याही वहिवाटीचे हक्काचा भंग होणार नाही याची जबाबदारी अर्जदार / मालकाने घेतली पाहिजे.

२९) बांधकाम पूर्ण झाल्यानंतर **सहा. संचालक, नगर रचना** यांचे तपासणी अंती बांधकाम पूर्णत्वाचा दाखला **मा. जिल्हाधिकारी, नागपूर** यांचेकडून घेणे अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

३०) अर्जदारास **सहा. संचालक, नगर रचना विभाग, नागपूर** यांचेकडे नियमानुसार आकारण्यात येणारे शुल्क खजिना दाखल करणे बंधनकारक राहील.

ह ग न
४४७६ / २०१०
१८ / ३८
SEAL OF THE JOINT SUB REGISTRAR CLASS 2, NAGPUR

३१) प्रिमियम क्षेत्राबाबत शुल्क आकारण्यात आलेले नाही. शासनाकडून प्राप्त निर्देशानुसार प्रिमियम शुल्काचे दर प्राप्त झाल्यानंतर त्या दरानुसार शुल्काचा भरणा सहा. संचालक, नगररचना विभाग, नागपूर यांचे कार्यालयांस करणे आवेदक यांना बंधनकारक राहील.

३२) **१५.०० मिटर पेक्षा जास्त उच्च इमारतींना आवश्यक असणाऱ्या अग्नी प्रतिबंधक सुविधा व प्रतिबंध विषयक उपकरणे अग्नीशमन विभाग, नागपूर महानगर पालीका, नागपूर यांचे निर्देशप्रमाणे व त्यांचे नाहरकत प्रमाणपत्रात नमुद असलेल्या सर्व अटी व शर्तीप्रमाणे स्वखर्चाने पुरविणे अर्जदार यांना बंधनकारक राहील.**

३३) प्रस्तुत परवानगी मिळणेकामी अर्जदार यांनी सादर केलेली कागदपत्रे व माहिती ही दिशाभुल करणारी अगर चुकीची आढळून आल्यास त्यास परवानगी धारकास जबाबदार धरुन भारतीय दंड विधान संहितेच्या तरतुदीनुसार फौजदारी कारवाईस पात्र धरण्यात येईल.

३४) उपरोक्त अटी व शर्ती पैकी कोणत्याही अटीचा अगर शर्तीचा भंग केल्यास सदरचा परवानगी आदेश रद्द समजण्यात येईल.

( मा. जिल्हाधिकारी, नागपूर ब्दारा अनुमोदित )

स्वा/- प्रविण दराडे
जिल्हाधिकारी, नागपूर

प्रति,

मे. जे.पी.इन्फ्रास्ट्रक्चर तर्फे
श्री. जगदिशप्रसाद हनुमानमल शर्मा,
राहणार- यश प्लाझा वर्धमाननगर, नागपूर

प्रत.

१. सहाय्यक संचालक, नगर रचना विभाग, नागपूर
२. उपविभागीय अधिकारी, नागपूर
३. तहसिलदार, हिंगणा
४. सचिव, ग्राम पंचायत, सुकळी (गुपचुप)
५. तालुका निरीक्षक, भुमी अभिलेख, हिंगणा
६. सहाय्यक दुय्यम निबंधक, हिंगणा

जिल्हाधिकारी, नागपूर करिता

| ह ग न | |
|---|---|
| ६६४६ | २०१० |
| १९ | ३८ |